R.No. MHAMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ७४

दि.०१ मार्च २०२६,वार: रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हाध्यक्ष पदी आयु. विजय डी. झनके यांची निवड

नवी मुंबई / के. एच. हनवते : - दिनांक २६ / ०२ / २०२६ रोजी सुर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर भवन, पंचशील बुद्ध विहार तुर्भे स्टोअर नवी मुंबई येथे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष: यु .जी. बोराडे गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची सभा घेण्यात आली . सर्वप्रथम वरिष्ठ केंद्रिय पदाधिकारी ड. एस. के. भंडारे ( राष्ट्रीय उपाध्यक्ष व केंद्रिय कार्यालय प्रमुख ), मा. भिकाजी कांबळे गुरुजी ( राष्ट्रीय सचिव व महाराष्ट्र राज्य प्रभारी ), आणि  यु. जी. बोराडे अध्यक्ष - महाराष्ट्र राज्य शाखा यांच्या हस्ते आदर्शांची पुजा करण्यात आली. नंतर सामुहिक त्रिसरण घेण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे स्वागत जिल्हा पदाधिकारी यांनी केले . सुरुवातीला महाराष्ट्र राज्य शाखेचे अध्यक्ष: यु.जी.बोराडे गुरुजी यांनी आपले विचार व्यक्त करतांना सांगितले की संपुर्ण जिल्हा कार्यकारिणी चांगले धम्म कार्य जोमाने करण्यासाठी आज अनुभवी पदाधिकारी व मागील कार्यकारिणीत असलेले पदाधिकारी यांना नवीन कार्यकारिणीत संधी देण्यात येत आहे, असे विधान व्यक्त केले. नवी मुंबई जिल्हयाने अनेक उपक्रम राबवुन चांगले कार्य केलेले आहे, यु. जी. बोराडे गुरुजींनी आपले मनोगत व्यक्त केले. यापुढे सुद्धा जास्तीत जास्त शिबीरे राबवून नवी मुंबईचे नाव नावलौकीक करावे. असे विचार व्यक्त केल, भिकाजी कांबळे ( राष्ट्रीय सचिव ) यांनी आपले प्रभावशाली विचार व्यक्त केले.भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व केंद्रिय कार्यालय प्रमुख: ड. एस. के. भंडारे यांनी अप्रतिम व प्रभावशाली मार्गदर्शन केले .   उपस्थित मान्यवरांनी अगोदर सर्वांच्या मुलाखती घेवुन प्रत्येक पदाधिकाऱ्याला त्यांनी केलेल्या कार्यानुसार पद वाटप करण्यात आली आणि पारदर्शक पद्धतीने पदाधिकारी यांना निवडून न्याय देण्यात आला. मा. ड. एस.के भंडारे गुरुजी यांनी पुढीलप्रमाणे नवनियुक्त कार्यकारिणी घोषीत केली .



भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा कार्यकारिणीत खालीलप्रमाणे पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली . मा. विजय झनके ( अध्यक्ष ), संजय झनके (सरचिटणीस ), प्रकाश माने ( कोषाध्यक्ष ), प्रकाश भालेराव ( उपाध्यक्ष-संस्कार ), हिरामण थोरात ( सचिव - संस्कार ), विनोद पाचपिंडे ( उपाध्यक्ष - पर्यटन ), राजश्रीताई पारधे ( सचिव - पर्यटन ) दत्ताश्रेय भालेराव (सचिव - पर्यटन ), मधुकर हिवराळे ( उपाध्यक्ष - संरक्षण ), दिपक कांबळे ( सचिव - संरक्षण ), दत्ताश्रय हराळ ( कार्यालयीन सचिव ), प्रा गौतम सोनकांबळे ( हिशोब तपासणीस ), आनंदबोधी निकाळजे ( संघटक ), कल्पनाताई कांबळे ( संघटक ), कविताताई कांबळे ( संघटक ), सुरेखाताई सावंत ( संघटक ),

चांदणीताई पाचपिंडे ( संघटक ), राजेंद्र झेंडे (संघटक ), सर्वांना वरिष्ठ पदाधिकारी यांनी भरीव शुभेच्छा देवुन संपुर्ण नवीन जिल्हा नवीन कार्यकारिणीचा वरिष्ठांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नवनियुक्त नवी मुंबई जिल्ह्याचे अध्यक्ष मा. विजय झनके गुरुजी यांनी आपले विचार व्यक्त करून केंद्र व महाराष्ट्र पदाधिकारी यांनी आम्हाला अमुल्य वेळ देवून व्यवस्थितरित्या पारदर्शकपणे आमच्या मुलाखती घेवुन पदावर काम करण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले.

नवी मुंबईत जोमाने काम करू असे वरिष्ठांना आश्वासीत करून उपस्थित सर्वांचे आभार मानले .

सोबतच धम्मयान दिनदर्शिका - २०२६ चा भरणा धम्मदान चेकद्वारे १५००० रुपये महाराष्ट्र कार्यकारिणीकडे सुपुर्द करण्यात आले. सरणत्तय घेवून समारोप करण्यात आला.

## सिध्देश्वर यात्रा महोत्सवात रविवार कुस्त्यांची दंगल

लातूर/प्रतिनिधी : - श्री सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने ७३ वा यात्रा महोत्सव सुरु आहे.या महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम पार पडत असून या अंतर्गत रविवार दि. १ मार्च रोजी कुस्त्यांची दंगल पार पडणार आहे. यात्रा महोत्सवातील या कुस्त्यांच्या दंगलीसाठी लातूर जिल्ह्यासह पर जिल्ह्यातील व परराज्यातील अनेक पैलवान आपली उपस्थिती लावत सिध्देश्वर केसरीचा मान मिळविण्यासाठी नशिब आजमावत असतात. या कुस्तींच्या दंगलीसाठी मल्लांना प्रोत्साहन देण्यासाठी शहरासह परिसरातील नागरिक व कुस्ती प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जांबुतकर यांच्यासह विश्वस्त विक्रम गोजमगुंडे व अशोक भोसले यांनी केले आहे.लातूरचे ग्रामदैवत असलेल्या श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानचा यात्रा महोत्सव पार पडत आहे. हा महोत्सव अंतिम टप्प्यात आला असून रविवार दि. १ मार्च रोजी या महोत्सवांतर्गत कुस्त्यांची दंगल पार पडणार आहे. सिध्देश्वर यात्रेतील कुस्त्यांसाठी लातूर जिल्ह्यासह पर जिल्हा व परराज्यातील अनेक मल्ल आपले नशिब आजमावण्यासाठी कुस्तीच्या फडात उतरत असतात. या कुस्तीमधील विजेत्याला मिळणाजया सिध्देश्वर केसरीच्या मानाच्या पुरस्कारासाठी अनेकजण वर्षभर मेहनत घेत असतात. त्यामुळे या कुस्त्यांची दंगल नागरिकांसह कुस्तीप्रेमींसाठी एक मोठी पर्वणी ठरत असते.या कुस्ती स्पर्धेत अंतिम विजेता ठरणाजया मल्लास सिध्देश्वर रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने चांदीची गदा देण्यात येते. याबरोबरच या कुस्ती स्पर्धेत सहभाग घेणाजयांना विविध पारितोषकांची उधळण केली जाते. या स्पर्धेत अंतिम कुस्तीत पराभूत होणाजया मल्लास लातूर महानगरपालिकेच्या वतीने लातूर केसरीचा मान देवून ५१ तोळे चांदीचे कडे देण्यात येते. त्याचबरोबर विविध मान्यवर व कुस्तीप्रेमींकडून देण्यात येणाजया पारितोषिकांमध्ये स्व. सुधाकरराव कोकाटे यांच्या स्मरणार्थ रायगड ग्रुपच्या वतीने अमर कोकाटे यांच्याकडून रत्नेश्वर केसरीचा मान देवून ५१ तोळ्याचे चांदीचे कडे देण्यात येते.



यासोबतच स्व. ज्ञानोबा गोपे यांच्या स्मरणार्थ ओम गोपे व जयप्रकाश गोपे यांच्या वतीने ५१ तोळे चांदीचे कडे तर स्व. किशनराव तुळजाराम हलवाई यांच्या स्मरणार्थ केतन हलवाई यांच्या परिवाराच्या वतीने २१ तोळे चांदीचे कडे वेगवेगळ्या विजेत्यांना देण्यात येते. यासोबतच अनेक मान्यवरांच्या वतीने वेगवेगळी पारितोषिके कुस्ती स्पर्धेत सहभागी होवून विजयी होणाजया मल्लांना देण्यात येतात. या स्पर्धा रविवार दि. १ मार्च रोजी श्री सिध्देश्वर देवस्थानच्या प्रांगणात सकाळी ११.३० वाजल्यापासून सुरु होणार आहेत. या कुस्ती स्पर्धेसाठी लातूर शहरासहजिल्ह्यातील मल्लांनी सहभागी नोंदवावा तसेच सहभागी स्पर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी कुस्तीप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन देवस्थानचे प्रशासक सचिन जाबुंतकर यांच्यासह विश्वस्त विक्रम गोजमगुंडे व अशोक भोसले यांनी केले आहे.

## कुणाल  अस्मिता यांचा शाही मंगल परिणय उत्साहात संपन्न

लातूर : कुणाल संगीता भाऊसाहेब इंगळे आणि अस्मिता बालिका भीमराव कांबळे यांचा मंगल परिणय सोहळा दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी लातूर येथील विश्व पॅलेस येथे अत्यंत उत्साहपूर्ण आणि थाटामाटात संपन्न झाला. या शुभ प्रसंगी नातेवाईक, मित्रपरिवार व मान्यवरांची उपस्थिती लाभली.




वर कुणाल संगीता भाऊसाहेब इंगळे हे गडचिरोली येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असून वधू अस्मिता बालिका भीमराव कांबळे यांनी एम.ए. (लोकप्रशासन) ही पदवी संपादन केलेली आहे. नवदांपत्यास उपस्थित मान्यवरांनी मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी दैनिक महावृत्तचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूरचे जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते, पुणे येथील उद्योजक निखिल पांडुरंग साकळे, लोखंडी सावरगाव येथील उपसरपंच नितीन बनसोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सोहळा आनंदी वातावरणात पार पडला असून उपस्थितांनी नवदांपत्याच्या पुढील आयुष्यासाठी मंगलमय शुभेच्छा व्यक्त केल्या.

## स्नेहसंम्मेलनाची धमाल बच्चा पार्टीने केली कमाल

मुरुड/महेंद्र आल्टे : येथील समर्थ किड्स ग्रुपचे




चौथे वार्षिक स्नेहसंमेलन १४ व १५ फेब्रुवारीला अतिशय आनंदाच्या आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनता विद्या मंदिरचे माजी उपप्राचार्य मा. गजेंद्र भोसले होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अंकित नाडे उपस्थित होते. तर कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सौ.माधवी बजरंग खडबडे व जनता विद्या मंदिरच्या माजी शिक्षिका सौ. विमल नामदेव पवार उपस्थित होत्या. तसेच मंचावर जनता विद्या मंदिरच्या माजी शिक्षिका सौ. चारूशीला भोसले, समर्थ किड्स ग्रुपच्या प्राचार्या सौ. संध्या भोसले यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पुजनाने करण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेल्या डॉ. सौ. माधवी खडबडे म्हणाल्या की, लहान मुलांचे उत्तम आरोग्य राखण्यासाठी योग्य अशा आहाराची मुलांना गरज आहे. मुलांचे आरोग्य उत्तम राहिले तरच त्यांचे मन देखील सुदृढ राहू शकते म्हणून आजच्या पालकांनी मुलांच्या आहाराकडे लक्ष देणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्या दैनंदिनीत नियमितता असावी.

श्री. अंकित नाडे यांनीही समर्थ किड्स ग्रुपच्या गुणत्तापूर्ण शिक्षणाचा गौरव करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात मा. गजेंद्र भोसले म्हणाले की, समर्थ किड्स ग्रुप ही विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षण देणारी शाळा असून शिक्षणासोबतच मुलांना नैतिक मुल्यांचे शिक्षण देण्याचे काम केले जाते. प्राचार्या सौ. संध्या भोसले यांनी अहवाल वाचन करून समर्थ किड्स ग्रुपच्या स्थापनेमागील उद्देश सांगितला. तसेच त्या म्हणाल्या की, समर्थ किड्स ग्रुपच्या वतीने नेहमी दर्जेदार शिक्षण देवून आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात आजचा विद्यार्थी कसा टिकेल यासाठी प्रयत्न केला जातो.

यावेळी समर्थ किड्स ग्रुपच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध कलागुणांचे सादरीकरण केले. स्नेहसंमेलनाची धम्माल आणि यामध्येच बच्चा पार्टीने केलीली कमाल पाहून श्रोते मंत्रमुग्ध झाले. यामध्ये पोवाडा, बालगीत, सीने संगीत, लोकगीत, कोळीगीत तसेच नाटकाच्या संवाद आणि अभिनयाच्या माध्यमातून स्क्रीप्टशिवाय सादरीकरण केले. तसेच नाटकाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांची मांडणी केली. समर्थ किड्स ग्रुपच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते त्याचे बक्षीस वितरणही विद्यार्थ्यांना आजी आजोबांसह प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास संचालक श्री. यशोजित भोसले, सौ. जाधव पुष्पा, सौ. शांता समुद्रे, सौ. स्वाती तवले यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. उदयन भोसले याने केले तर आभार सौ. चारूशीला भोसले यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी फोटोग्राफर दत्ता रकाटे, विद्यार्थी, शेजारी, पालक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, स्नेहीजन व शिक्षणप्रेमी उपस्थित होते.

# इजराइलइराण संघर्ष पेटती ठिणगी की तिसऱ्या महायुद्धाची चाहूल?

मध्यपूर्वेतील भू-राजकारण पुन्हा एकदा धगधगत आहे. इजराइल आणि इराण यांच्यात वाढत चाललेला संघर्ष केवळ दोन देशांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो संपूर्ण जगासाठी चिंतेचा विषय बनला आहे. गेल्या काही वर्षांत सावधगिरीच्या छायेत चालणारे छुपे संघर्ष आता उघड स्वरूपात दिसू लागले आहेत. ही परिस्थिती दुर्लक्षित करण्याइतकी साधी नाही.

इराण आणि इजराइल यांच्यातील वैचारिक, धार्मिक आणि सामरिक मतभेद खोलवर रुजलेले आहेत. इराणने इस्रायलला मान्यता न देण्याची भूमिका सातत्याने घेतली आहे, तर इजराइलने इराणच्या अणुकार्यक्रमाबाबत तीव्र आक्षेप नोंदवले आहेत. याशिवाय लेबनॉनमधील हिज्बुल्ला आणि गाझातील हमास यांसारख्या गटांना मिळणाऱ्या कथित पाठबळामुळे इस्रायलची सुरक्षा चिंता अधिक तीव्र झाली आहे. परिणामी, परस्पर संशय आणि आक्रमक धोरणे यांचा दुष्टचक्र सुरूच आहे.

अलीकडील लष्करी हालचाली, ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले, तसेच प्रत्युत्तरात्मक कारवाया यामुळे तणाव धोकादायक पातळीवर पोहोचला आहे. युद्ध औपचारिकरीत्या जाहीर झाले नसले तरी प्रत्यक्षात संघर्षाची परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र आहे. या संघर्षाचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसत आहे. युद्धाच्या सावटाखाली भीती, स्थलांतर, जीवितहानी आणि आर्थिक नुकसान यांची मालिका सुरू होते आणि इतिहास सांगतो की त्याची किंमत पिढ्यान् पिढ्या मोजावी लागते.

जागतिक स्तरावरही या संघर्षाचे पडसाद उमटत आहेत. मध्यपूर्व हा जगाच्या तेलपुरवठ्याचा कणा मानला जातो. या भागातील अस्थिरतेमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर चढ-उतार होण्याची शक्यता वाढते, ज्याचा थेट परिणाम भारतासह विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांवर होऊ शकतो. आधीच महागाई, पुरवठा साखळीतील अडथळे आणि आर्थिक अनिश्चितता यांचा सामना करणाऱ्या जगासाठी हा आणखी एक धक्का ठरू शकतो.

अमेरिका आणि पाश्चात्त्य देश पारंपरिकरीत्या इजराइलच्या सुरक्षेला पाठिंबा देतात, तर इराणला काही प्रादेशिक शक्तींचे सहानुभूतीपूर्ण समर्थन मिळते. अशा वेळी एखादी चूक, गैरसमज किंवा अतिरेकी प्रतिक्रिया व्यापक प्रादेशिक युद्धाला कारणीभूत ठरू शकते. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघ आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांची जबाबदारी अधिक वाढते. केवळ निवेदने देऊन चालणार नाही; प्रभावी मुत्सद्देगिरी आणि संवाद प्रक्रियेला चालना देणे आवश्यक आहे.

भारतासाठी ही परिस्थिती विशेष महत्त्वाची आहे. भारताचे इजराइलसोबत संरक्षण व तंत्रज्ञान क्षेत्रात घनिष्ठ संबंध आहेत, तर इराण भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा भागीदार राहिला आहे. त्यामुळे भारताला अत्यंत संतुलित आणि दूरदर्शी भूमिका घ्यावी लागणार आहे. परराष्ट्र धोरणातील सूक्ष्म समतोल राखणे ही मोठी कसरत ठरणार आहे.

इतिहासाची शिकवण स्पष्ट आहे युद्ध सुरू करणे सोपे, पण संपवणे अत्यंत कठीण असते. एकदा संघर्ष भडकला की त्याची व्याप्ती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता प्रबळ असते. म्हणूनच या टप्प्यावर संयम, संवाद आणि कूटनीती हाच एकमेव शहाणपणाचा मार्ग आहे.

आज जग एका वळणावर उभे आहे. इजराइल आणि इराण यांनी तात्काळ तणाव कमी करण्याच्या दिशेने पावले उचलली नाहीत, तर मध्यपूर्वेतील ही ठिणगी मोठ्या जागतिक संकटात परिवर्तित होऊ शकते. शांततेचा मार्ग कठीण असला तरी तोच मानवतेच्या हिताचा आहे आणि तो स्वीकारणे हीच काळाची खरी गरज आहे.

# जेईई परीक्षेत जिल्ह्यात पहिला आल्याबद्दल सुमित धावणे याचा सत्कार

लातूर: जेईई मेन्स परीक्षेत लातूर जिल्ह्यात पहिला



आल्याबद्दल सुमितगोविंद धावणे या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी राष्ट्र सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष पाडुरंग देडे, प्रेमाताई देडेयांनी सत्कार केला. सुमित धावणे या विध्यार्थ्याने आंतरभारती, राष्ट्रसेवा दलाची संस्कार शिबीरांत सहभाग घेतलेला आहे. अत्यंत अभ्यासू आणि होतकरू विद्यार्थी आहे. यावेळी सुमितची आई सौ साधना धावणे, इतर विद्यार्थी, पालक उपस्थित होते

# पर्यावरण पूरक होळी साजरी करावी.

देशात होळी हा सण प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या पध्दतीने सर्वत्र साजरा करण्यात येतो.यामुळे आपल्याला सर्वत्र होळी मिलन दिसून येते.महाराष्ट्रात मराठी माणसांसाठी होळीचे आगळीवेगळे महत्त्व आहे.होळी म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा सण. ज्याप्रमाणे इंग्रजी वर्षानुसार डिसेंबर हा शेवटचा महिना असतो त्याचप्रमाणे होळीचा फाल्गुन महिना मराठी माणसासाठी शेवटचा महिना आहे. नवीन वर्षाची सुरुवात चैत्र महिन्यापासुन होते म्हणजेच गुडी पाडवा. त्यामुळे जुने वर्ष होळी व धुलीवंदनाच्या रूपात साजरे करून जुन्या वर्षाला निरोप दिला जातो आणि गुढीपाडव्याच्या निमित्ताने नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते.बदलत्या काळानुसार होळी व धुलीवंदन साजरे करतांना पर्यावरण व निसर्गाचे संतुलन जोपासने अत्यंत गरजेचे आहे.त्याच अनुषंगाने कोणत्याही धर्माचे सण असो त्यांनी सुध्दा निसर्गाला कुठेही इजा पोहोचणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत वाढते प्रदूषण व भीषण पाणी टंचाई सर्वांसाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.त्यामुळे होळी हा सण साजरा करतांना पर्यावरणाशी निगडित असावा जेणेकरून निसर्गाला इजा पोहोचणार नाही.कारण होळी या सणाला लाकुड,पाणी यांचा वापर जास्त होतो आणि या दोन्ही गोष्टी पर्यावरणाशी अत्यंत निगडित आहेत.होळीला दरवर्षी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. त्यामुळे होळी या सणाला पाण्याचा वापर कमी करावा व पर्यावरणातील वाढते प्रदूषण पहाता स्वच्छतेकडे सर्वांनीच जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करावे.देशात आणि जगात पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे आणि वाढणार सुध्दा आहे.त्यामुळे होळीच्या सणाला पाण्याचा वापर टाळावा व पाणी वाचविण्याचा संकल्प सर्वांनीच करावा.उष्णतेचे वादळ आणि पाण्याचा हा!हा!कार यामुळे मानव व पशुपक्षी नेहमीच भरडत असतो आणि भरडत आहे. वाढती लोकसंख्या यामुळे मानवाने भुभावर पुर्णतः अतिक्रमण केल्याचे दिसून येते.देशात होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केल्या जातो.होळीच्या दीवशी गुलाल, रंग,वारीस इत्यादीसह केमिकल युक्त रंगाचा वापर होतांना आपण पहात असतो.यामुळे डोळ्यांना व चेहऱ्याला इजा होऊ शकते यापासून सावध राहण्याची गरज आहे.रंग खेळताना कोणीही हा विचार करत नाही की पाण्याचा व्यत्यय कीती होतो.होळी या सणाला दरवर्षी लाखो लिटर पाणी वाया जात असते आणि पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाळ्यात पाण्यासाठी सर्वांनाच वणवण भटकावे लागते.आजही देशासह महाराष्ट्रात पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दीसते व याचा परिणाम शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भोगावा लागतो.आजच्या परीस्थितीत हवामान खाते सांगत आहे की यावर्षी उन्हाळा नेहमीपेक्षा जास्त तापणार आहे. यावरून आपण समजू शकतो की पाण्याची समस्या कमी न होता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.त्यामुळे आज पाण्याचा एक एक थेंब वाचवीण्याकरीता मानवाने चुरशीचे प्रयत्न केले पाहिजे. होळीचा सण हा पाच दिवस म्हणजेच पंचमी पर्यंत चालतो. त्यामुळे या काळात पाण्याचा वापर जास्तीत जास्त टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणे देशात अवैधरित्या जंगल तोडीमुळे लाकडांची कमतरता पहाता होळी दहणाकरीता कमीत कमी लाकडांचा उपयोग केला पाहिजे किंवा होळी दहनाकरीता गोअरीचा (काउडंग)चा वापर जास्त करावा यामुळे पर्यावरणात सुगंध निर्माण होईल.देशात आणि जगात पाण्याची समस्या पहाता फक्त देशी गुलाल किंवा फुलांचा वापर करून होळी या महत्त्वपूर्ण सनाचा आनंद घ्यावा.आज पाण्याच्या भरोशावरच मनुष्य,पशुपक्षी,अन्न-धान्य, संपूर्ण जीवसृष्टी,जंगल हे सर्व पाण्यावरच अवलंबून असते. पाणी हे सोनसमजा आणि होळीला फक्त गुलाल किंवा फुलांचा वापर करून होळीचा सण साजरा करावा.ज्या प्रमाणे मानवाला अन्न,वस्त्र, निवारा या गोष्टीची गरज आहे त्याचप्रमाणे आज संपूर्ण जिवसृष्टीला व पृथ्वीला पाण्याची नितांत गरज आहे.जंगल तोडीमुळे निसर्गाचे संतुलन विस्कळीत झाले आहे.त्यामुळे आज हिंसक पशु (वाघ, बिबट्या,अस्वल) इत्यादी अनेक प्राणी जंगलातून गावात व शहरात शिरकाव करतांना दिसते.कारण मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी जंगल संपदेवर अतीक्रमन केल्याचे दिसून येते. त्यामुळे जंगलातील प्राणी शहरात येत नसुन आपण जंगलाकडे आगेकूच(अतिक्रमण) करीत आहोत. त्यामुळे होळी करीता कमीत कमी लाकडांचा वापर केला पाहिजे. त्याचप्रमाणे होळीच्या निमित्ताने अवैध वृक्षतोड होण्याची शक्यता असते ती ताबडतोब थांबवली पाहिजे.आता वाढत्या कारखान्यांमुळे आणि परमाणु परीक्षण,शस्त्रस्पर्धा आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.त्यामुळे होळीला पाण्याचा अपव्यय टाळला पाहिजे.भारतासह संपूर्ण जगभर २२ मार्चला जागतीक जल दीनपाळला जातो याची कृती होळीच्या सणा पासुन करावी व पाणी वाचवावे.कारण पाणी हे निसर्गाचे अनमोल रत्नआहे. त्याला वाचवीण्याचा प्रयत्न सर्वांनीच सर्व स्तरातून केला पाहिजे.इतर देशांप्रमाणे भारतसुध्दा पाण्याच्या बाबतीत रेडलाईट झोनमध्ये आहे. त्यामुळे भारतसुध्दा पाणी टंचाईच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते.त्यामुळे होळीचे औचित्य साधून प्रत्येकांनी आपल्या परीसरात एक-एक झाड लावुन निसर्गाला पुनरूज्जीवीत केले पाहिजे व सर्वांनीच पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे. यातच खऱ्याअर्थाने होळी व धुलीवंदन दीसुन येईल.त्यामुळे जान है तो जहान है हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारून पुढचे पाऊल टाकायला पाहिजे. करोना महामारीने मानवजातीला बरेच काही शिकवीले. त्याचे अनुकरण करून प्रत्येकांनी स्वतःच्या प्रकृतीची काळजी स्वतःच घेतली पाहिजे. होळी उत्सवात उन्माद नको! हुल्लडबाजी नको परंतु आनंद भरपूर घ्यावा. यामुळे सर्वांचेच जीवन सुरक्षित रहाण्यास मोठी मदत मिळेल. कारण आपण सुरक्षित तर निसर्ग सुरक्षित, निसर्ग सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित, संपूर्ण जीव सृष्टी सुरक्षित तर जग सुरक्षित.यासाठी होळीच्या महत्वपूर्ण सणाचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावलेच पाहिजे. यामुळे एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल व पर्यावरण सुधारण्यास मोठी मदत होईल आणि होळी या सणाचे महत्त्व संपूर्ण जगात निसर्ग वाचविण्याच्या दृष्टीकोनातून चांगला संदेश जगभर पसरेल.जय हिंद.

**लेखक.**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# होळी आणि धूलिवंदन : रंगांचा उत्सव की सामाजिक आत्मपरीक्षणाची संधी?

फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला साजरा होणारा होळीचा सण हा केवळ रंगांचा उत्सव नाही, तर तो भारतीय संस्कृतीच्या अंतःकरणातील आनंद, बंधुभाव आणि परिवर्तनाचा संदेश घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी साजरे होणारे धूलिवंदन म्हणजे रंगांच्या उधळणीतून नात्यांना नवसंजीवनी देण्याचा दिवस असतो. गावोगावी पेटणाऱ्या होळीच्या ज्वाला आणि सकाळी उधळले जाणारे रंग यामागे एक सखोल तात्त्विक अर्थ दडलेला आहे, ते म्हणजे वाईट प्रवृत्तींचे दहन आणि चांगुलपणाचा स्वीकार. होळीचा उगम पौराणिक कथांशी जोडलेला आहे. दैत्यराज हिरण्यकश्यपू आणि त्याची बहीण होलिका यांची कथा आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. भक्त प्रल्हादाच्या निश्चयी श्रद्धेवर मात करण्यासाठी होलिकेने अग्नीत प्रवेश केला; परंतु सत्य, श्रद्धा आणि भक्तीच्या बळावर प्रल्हाद वाचला आणि होलिका भस्मसात झाली. या कथेतून मिळणारा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. अहंकार, अन्याय आणि अत्याचाराचा अंत निश्चित असतो. परंतु प्रश्न असा आहे की, आपण केवळ होळी पेटवतो की खरोखरच आपल्या मनातील 'होलिका' जाळतो? आजच्या समाजात असूया, मत्सर, द्वेष, राजकीय स्वार्थ, धार्मिक ध्रुवीकरण यांसारख्या प्रवृत्ती वाढताना दिसतात. अशा वेळी होळी ही केवळ विधी न राहता आत्मपरीक्षणाची संधी ठरायला हवी.

धूलिवंदन म्हणजे रंगांचा खेळ. सकाळी अंगावर रंग उधळत आपण एकमेकांना बुरा न मानो होली है असे म्हणत हसतखेळत क्षमा मागतो, क्षमा देतो. समाजातील भेद, जात, धर्म, वर्ग, श्रीमंती-गरीबी क्षणभरासाठी का होईना, विरघळतात. रंगांचे वैशिष्ट्य असे की ते प्रत्येकाला सारखेच रंगवतात. पांढरा कुर्ता असो वा महागडी साडी, रंग लागला की सगळे समान! आजच्या काळात ही समता टिकवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. सोशल मीडियाच्या आभासी जगात आपण 'लाईक्स' आणि 'फॉलोअर्स'च्या मोजपट्टीवर नाती मोजतो. प्रत्यक्ष भेटीगाठी



कमी होत चालल्या आहेत. धूलिवंदन हा सण आपल्याला सांगतो माणसांमध्ये मिसळा, मनमोकळे हसा, जुने राग विसरा. अलीकडच्या काळात होळीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर लाकूड जाळले जाते. रासायनिक रंगांचा वापर वाढतो. त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते, त्वचेच्या तक्रारी वाढतात. सण साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणे ही देखील सामाजिक जबाबदारी आहे. शेतीप्रधान देशात फाल्गुन हा हंगाम संपण्याचा आणि नवीन पीक येण्याचा काळ आहे. होळी ही निसर्गाच्या चक्राशी जोडलेली परंपरा आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक होळी, नैसर्गिक रंगांचा वापर आणि पाण्याची बचत हे आजचे 'नवे संस्कार' ठरायला हवेत.

महाराष्ट्रात धूलिवंदनानंतर रंगपंचमीही मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. नागपूर सारख्या शहरात तर मित्रपरिवार, कुटुंबीय आणि समाजातील विविध घटक एकत्र येऊन हा सण आनंदाने साजरा करतात. परंतु काही ठिकाणी रंगांच्या नावाखाली जबरदस्ती, मद्यपान, महिलांवर गैरवर्तन यासारखे प्रकारही घडतात. हे चित्र चिंताजनक आहे. सणांचा आत्मा हा आनंद आणि सन्मानात असतो; दडपशाहीत नाही. रंग लावला म्हणजे अधिकार मिळाला अशी मानसिकता बदलायला हवी. धूलिवंदन हे 'सन्मानाने रंगवणे' शिकवते, 'जबरदस्तीने रंग चोपडणे' नव्हे. भारतीय समाजजीवनात सणांचे राजकारणाशीही नाते आहे. काही वेळा सणांच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न होतात. होळीचा खरा संदेश मात्र एकात्मतेचा आहे. विविधतेत एकता ही भारताची ताकद आहे. होळी आपल्याला सांगते मतभेद असू द्या, पण मनभेद नकोत.

आज देशासमोर बेरोजगारी, महागाई, शिक्षण-आरोग्याच्या समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न उभे आहेत. होळीच्या ज्वालेसमोर उभे राहून आपण या प्रश्नांवरही विचार करायला हवा. केवळ व्यक्तीगत राग-द्वेष जाळून चालणार नाही; समाजातील अन्याय, विषमता आणि भ्रष्टाचार यांनाही जाळण्याचा निर्धार हवा. इतिहासात होळीच्या उत्सवात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर राहिला आहे. लोकगीते, फुगड्या, सामूहिक नृत्य यांतून स्त्रियांनी आपला आनंद व्यक्त केला. आजच्या काळात स्त्री-पुरुष समानतेचा संदेशही या सणातून द्यायला हवा. महिलांना सुरक्षित आणि सन्मानाने सण साजरा करता यावा, ही समाजाची जबाबदारी आहे. होळीच्या निमित्ताने बाजारपेठा गजबजतात. रंग, पिचकाऱ्या, मिठाई, पारंपरिक पदार्थ या सर्वांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. गावरान पुरणपोळी, करंजी, गूळ-पोहे यांचा सुगंध घराघरांत दरवळतो. सण हा अर्थचक्रालाही गती देतो. मात्र, खर्चाच्या स्पर्धेत अडकून मूळ आनंद हरवू नये, याची जाणीव ठेवायला हवी.

होळी आणि धूलिवंदन हे नात्यांच्या पुनर्बांधणीचे दिवस आहेत. वर्षभरात गैरसमज होतात, कटुता वाढते. पण या सणाच्या निमित्ताने आपण एकमेकांना भेटतो, मिठी मारतो, रंगपंचमीच्या शुभेच्छा देतो आणि नवे वर्ष नव्या उत्साहाने सुरू करतो. ज्या समाजात संवाद थांबतो, तिथे तणाव वाढतो. होळीचा रंग म्हणजे संवादाची सुरुवात. धूलिवंदन म्हणजे अहंकाराची धूळ झटकून टाकणे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंतर्मनातील होळी. आपल्या मनात साठलेले राग, भीती, न्यूनगंड, असुरक्षितता या सर्वांना जाळणे आवश्यक आहे. होळीची ज्वाला आपल्याला धैर्य देते; धूलिवंदनाचा रंग आपल्याला आनंद देतो. आजच्या वेगवान, तणावपूर्ण जीवनात आपण आनंद साजरा करायलाही विसरलो आहोत. होळी हा सण सांगतो, जगणे म्हणजे केवळ स्पर्धा नव्हे, तर उत्सवही आहे.

होळी आणि धूलिवंदन हे केवळ परंपरा नाहीत; ते जीवनदृष्टी आहेत. अन्यायावर न्यायाचा विजय, द्वेषावर प्रेमाचा विजय, निराशेवर आशेचा विजय हा संदेश या सणात दडलेला आहे. यावर्षी होळी पेटवताना आपण केवळ लाकूड जाळू नये; आपल्या मनातील कटुता जाळू या. धूलिवंदन साजरे करताना केवळ रंग उधळू नये; प्रेम, सन्मान आणि समतेचे रंग उधळू या. रंगांच्या या सणात प्रत्येकाच्या आयुष्यात आनंदाची उधळण होवो, समाजात सौहार्द फुलो आणि आपल्या अंतःकरणातील होलिका भस्मसात होवो, हीच अपेक्षा. सर्वांना होळी आणि धूलिवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# जवाहरलाल नेहरु प्राथमिक शाळेत मराठी भाषा गौरव दिनी विद्यार्थ्यांचा नृत्याविष्कार



लातूर :- पंडित जवाहरलाल नेहरु शिक्षण संस्थेच्या गांधी नगरातील जवाहरलाल नेहरु प्राथमिक विद्यालयात दि.२७ फेब्रुवारी २०२७ रोजी मराठी भाषा गौरव दिन तथा वि.वा.शिरवाडकर यांच्या जयंतीनिमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांनी मराठी गीतांवर नृत्य करुन कलाविष्कार सादर केला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याध्यापिका तथा संस्था संचालिका इंदुताई बटनपूरकर यांच्या हस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार वाहून अभिवादन करुन करण्यात आले.त्यानंतर पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. मंचावर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिंदे शिवसेनेचे लातूर जिल्हा उपप्रमुख सदाशिव गव्हाणे पाटील,इंजि.मारुती कांबळे,सामाजिक कार्यकर्ते यलाप्पा यादव,संस्थेचे कोषाध्यक्ष हरिभाऊ कोनाळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी मुख्याध्यापिका सुनीता नेत्रगावकर यांनी मराठी भाषा गौरव दिनाविषयी सविस्तर मार्गदर्शन करुन मराठीचा दैनंदिन व्यवहारात वापर करुन मायमराठीवरील प्रेम सिध्द करावे असे आवाहन केले.

संस्थेचे कोषाध्यक्ष हरिभाऊ कोनाळीकर यांनीही मराठी भाषेचा बोलणे,लिहिणे,जगण्यातून वापर करणे हेच आपले नैतिक कर्तव्य पार पाडावे असे मत व्यक्त केले.यावेळी शाळेतील विद्यार्थी,विद्यार्थींनी छ.शिवरायांचा पाळणा,महाराष्ट्र गीत व इतर अनेक मराठी गीतांवर लक्षवेधी नृत्य करुन उपस्थितांची वाहवा मिळवली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम संयोजक सहशिक्षिक जयश्री बोंद्रे यांनी केले.सूत्रसंचालन सहशिक्षक अर्जून सोनाळे यांनी तर आभार प्रदर्शन विजया कुकाले यांनी केले.या कार्यक्रमासाठी सहशिक्षक मानाजी पाटील,विजयकुमार जाधव, एस.जी.पेठे, लिपिक श्रीकृष्ण शिंदे,सेवक नारायण बोयणे आदिंनी परिश्रम घेतले.या कार्यक्रलाा विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांस्कृतिक कार्यक्रमात शैक्षणिक विषयावर नबोलता राजकीय भाषण केल्याने वरिष्ठांकडून कार्यवाही!

केज/प्रतिनिधी-सद्या शैक्षणिक संस्था



आणि जिल्हापरिषद शाळेत ठिक ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या कार्यक्रमाला शाळेच्या वतीने अनेक राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांना आमंत्रित केले जाते. त्याच अनुषंगाने साळेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाला शैक्षणिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांना आमंत्रित केले होते. यामध्ये केजच्या शिक्षण विस्तार अधिकारी श्री. दत्तात्रय चाटे यांना देखील आमंत्रित केल्याने ते उपस्थित होते. परंतु यावेळी ते स्टेजवर नशापाणी करून आले आणि शैक्षणिक विषयावर न बोलता त्यांनी एखाद्या राजकीय पुढाऱ्यासारखे राजकीय भाषण ठोकत या गावातील पुढाऱ्यावर भाषण केल्याचा आरोप लक्ष्मण ओव्हाळ यांनी करत त्यांच्या विरोधात वरीष्ठांकडे लेखी तक्रार केल्याने त्यांचेवर वरिष्ठांकडून कार्यवाही करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

तसेच या सांस्कृतिक कार्यक्रमात दारूच्या नशेत राजकीय भाषण केल्याने वरिष्ठांकडून कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील साळेगाव येथे दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी ठीक सायं. ८-०० वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या शालेय सांस्कृतिक कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले केज पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय मुरलीधर चाटे हे कार्यक्रमाच्या स्थळी दारू पिऊन नशेमध्ये कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांनी या कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यासमोर, विशेष करून मोठ्या संख्येने उपस्थित असलेले विद्यार्थी व नागरिकासमोर, अयोग्य व राजकीय स्वरूपाचे भाषण केले.

सदर प्रकारामुळे शालेय वातावरणाची व कार्यक्रमाची प्रतिष्ठा मुलीन झाले असून विद्यार्थ्यावर चुकीचा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या कार्यक्रमाच्या ठिकाणी या गावचे रहिवासी असलेले व वंचित बहुजन आघाडी बीड जिल्हा पूर्वचे युवक जिल्हा सचिव लक्ष्मण शिवाजी ओव्हाळ हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते.ओव्हाळ यांनी शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय चाटे यांच्या गैरवर्तनाचा प्रकार पाहिला आहे. व ते प्रत्यक्षात उपस्थित होते. त्यामुळे ओव्हाळ हे सदर घटनेचे साक्षीदार आहेत. अशा आशयाची लेखी तक्रार लक्ष्मण शिवाजी ओव्हाळ यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्याकडे दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी केली आहे. ओव्हाळ यांनी कार्यकारी मुख्य अधिकारी यांच्याकडे गंभीर स्वरूपाची तक्रार करून सदर प्रकरणाची गांभीर्याने सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर शिस्तभंग व निलंबनाची कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

बीड जिल्हा परिषद, प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ.किरण कुंवर यांनी लक्ष्मण ओव्हाळ यांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेऊन दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय मुरलीधर चाटे यांना नोटीस काढून सदर प्रकरणी नोटीस मिळाल्यापासून तीन दिवसाच्या आत प्रस्तुत कार्यालयास खुलासा देण्याचे आदेशित केले आहे.

तसेच केज पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यांना देखील कळवण्यात आले आहे की, आपल्या स्तरावरून सदरच्या तक्रारीची सविस्तर चौकशी करून दोन दिवसात वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा असे आदेशित करण्यात आलेले आहे.परंतु या घटनेला पाच दिवस उलटूनही अद्याप पर्यंत शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय चाटे यांचे विरुद्ध कोणतीही कार्यवाही केले नसल्याने पाणी नक्कीच कुठंतरी मुरतंय अशी शंका आता उपस्थित होवु लागली आहे.

गटशिक्षणाधिकारी यांचेकडून चाटे यांची पाठराखण-साळेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाला मी स्वता: माझे सोबत गावातील माजी सरपंच, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा (महिला) , पत्रकार, राजकीय, सामाजिक मान्यवर उपस्थित होते. माझ्यासमोर दत्तात्रय चाटे यांनी राजकीय भाषण केले परंतु ते कुठल्याही प्रकारची नशा पाणी केल्याचे मलातरी जाणवले नाही. तसेच आम्हाला अशा कार्यक्रमांना बोलावले आणि आम्ही त्या कार्यक्रमाला जावेच असे कोणतेही आमचेवर बंधन नाही. त्यामुळे दत्तात्रय चाटे यांनी जर नशा पाणी केली असती तर ते या कार्यक्रमाला आलेच नसते. केलेली तक्रार ही चुकीची आहे. अशी दत्तात्रय चाटे यांची पाठराखण गटशिक्षणाधिकारी केज यांनी केली आहे.

# रोडवर आडवून डोळ्यात चटणी टाकून सोनारास लुटणारी दरोडेखोरांची टोळी अखेर जेरबंद

केज/प्रतिनिधी-रोडवर आडवून डोळ्यात चटणी टाकून सोनारास लुटणारी दरोडेखोरांची टोळी अखेर स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने दमदार कामगिरी केली आहे.



याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक २१ फेब्रुवारी २०२६ रोजी युसुफ वडगाव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.४६/२०२६ कलम ३०९(६) बी.एन.एस.प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर फिर्यादी हे सोनार असून ते सोने विक्री करण्यासाठी जुन्या डिघोळआंबा येथे एका मोटरसायकल बसून जात असताना केज तालुक्यातील होळ ते डिघोळआंबा येथील दर्ग्याजवळ अज्ञात दोन मोटार सायकलवर चार जणांनी येऊन फिर्यादी सोनारांची मोटरसायकल आडवून त्यांच्या डोळ्यात तिखट चटणी टाकून व त्यांना चाकूचा धाक दाखवून मारहाण करून हातातील सोन्याची पिशवी जबरदस्तीने हिसकावून घेऊन पळून गेले होते. व्यापारी सोनार यांच्या फिर्यादीवरून युसुफ वडगाव पोलीस ठाणे येथे गु.र्.नं.४६/२०२७ कलम ३०९(६) बी.एन.एस.नुसार दिनांक २१ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अज्ञात आरोपीचा शोध हा युसुफ वडगाव पोलीस ठाण्याचे पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घेत होते परंतु आरोपीचा ठावठिकाणा लागत नव्हता.

वरील नमूद गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखा करत असताना एकूण जवळपास ५० पेक्षा जास्त सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले होते.

सदर सीसीटीव्ही फुटेज मधील संशयित इसमांची माहिती घेणे सुरू असताना दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमी मिळाली की, सदर सीसीटीव्ही फुटेज मधील संशयित इसम नामे रोहित रणजीत धिमधीमे हा असून तो आंबेजोगाई बसस्थानक लगत राज मेडिकल जवळ उभा असल्याची माहिती मिळाल्यावर त्यास पथकाने ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता त्यांनी सदरचा गुन्हा हा सुदाम गणपत सोनवणे रा. डिघोळअंबा ता. धारूर व पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार वीरसिंग रीसपालसिंग टाक रा.आंबेजोगाई यांच्या सांगण्यावरून त्यांचे इतर साथीदार नामे अभिषेक अशोक घाटूळ रा. कऱ्हेवाडी ता. परळी, कानिफनाथ विलास डुरकर रा.क्रांतीनगर आंबेजोगाई, यशोदीप कल्याण किर्तन रा.सातेफळ ता. आंबेजोगाई यांच्यासह मिळून केला असल्याचे सांगितले.

सदर गुन्ह्यात एकूण सहा आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहेत. सदर प्रकरणातील आरोपी पकडण्यास स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे.

तसेच आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेल्या दोन मोटरसायकली त्यांची अंदाजे किंमत १ लाख ५० हजार रुपये, ६ मोबाईल ज्याची अंदाजे किंमत ९० हजार रुपये यासह सोनाराचे जबरदस्तीने चोरून नेहलेले सोन्याचे दागिने ज्याची अंदाजे किंमत ३ लाख रुपये असे एकूण ५ लाख ४० हजार रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

वरील सहा आरोपी व जप्त केलेला मुद्देमाल हा पुढील तपास कामी पोलीस ठाणे युसुफ वडगाव यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

सदरील कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, स्थानिक गुन्हे शाखेचे शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार जफर पठाण, महेश जोगदंड, दिलीप गीते, मारुती कांबळे, दीपक खांडेकर, गणेश मराडे, विकी सुरवसे यांनी केली आहे.

# जोडधंदा केल्याशिवाय शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती शक्य नाही-आ. कराड

लातूर- नव्याने उभारण्यात आलेल्या




रेणापूर येथील अद्यावत सर्व सोयीनेयुक्त पशुवैद्यकीय चिकित्सालय इमारतीतून शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या अडीअडचणीची सोडवणूक होईल असे सांगून शेतीला जोडधंदा केल्याशिवाय शेतकऱ्यांना आर्थिक सुबत्ता येणार नाही, आर्थिक उन्नती होणार नाही त्यासाठी शेतकऱ्यांची मानसिकता बदलावी लागेल असे प्रतिपादन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

पशुसंवर्धन विभागामार्फत रेणापूर येथे तालुका पशुवैद्यकीय चिकित्सालयाची भव्य दोन मजली इमारत उभारण्यात आली असून या इमारतीचा लोकार्पण सोहळा लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शनिवारी सकाळी झाले. याप्रसंगी पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. राजकुमार पडिले, सहा. आयुक्त डॉ. राघवेंद्र पडगलवार, पंसचे गटविकास अधिकारी सुमित जाधव, ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक सौ. अनिता अलगुले, सार्वजनिक बांधकाम रेणापूर उपविभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मण देवकर, अभियंता प्रवीण पवार, भाजपाचे अभिषेक आकनगिरे, महेंद्र गोडभरले, पद्माकर चिंचोलकर, दशरथ सरवदे, सतीश आंबेकर, शरद दरेकर, अनिल भिसे, बाबासाहेब घुले, दत्ता सरवदे, मारूफ आतार, श्रीकृष्ण मोटेगावकर, विजय चव्हाण, महेश गाडे, अच्युत कातळे यांच्यासह संबंधित अधिकारी, भाजपाचे लोकप्रतिनिधी,



पदाधिकारी, पशुपालक, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, शेतकऱ्यांचे पशुधन वाढले पाहिजे त्यासाठी शासन प्रयत्न करीत असून सर्व सोयींनी युक्त असे पशु चिकित्सालयाच्या इमारतीची रेणापुरात उभारणी झाली असून या इमारतीतून पशुधनाच्या अडीअडचणी तातडीने दूर व्हाव्यात. पशुसंवर्धन आणि चिकित्सालय अनुषंगाने ज्या ज्या योजना राबवायच्या आहेत अशा योजनांचे प्रस्ताव संबंधित अधिकाऱ्यांनी तयार करावेत या सर्व प्रस्तावांना पशुसंवर्धन खात्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडून मंजूर करून घेण्याची आणि त्यासाठी लागणाऱ्ा निधी आणण्याची जबाबदारी माझी असेल असेही त्यांनी बोलून दाखविले.

शासनाच्या विविध योजनेचा शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून द्यावा असे सांगून रेणापूर तालुक्यातील विविध विभागात आत्मियतेने आणि तळमळीने काम करणारे कर्तुत्वान कर्मचारी आहेत ग्रामीण रुग्णालयाच्या अधीक्षक अनिता अलगुले यांनी राज्यस्तरावरील पुरस्कार प्राप्त केला तर खरोळा येथील पशु वैद्यकीय दवाखान्याने राज्यात पहिला क्रमांक मिळवला याबद्दल संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक करून आ. रमेशआप्पा कराड यांनी अभिनंदन केले.

प्रारंभी पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. राजकुमार पडिले यांनी प्रास्ताविकातून रेणापूर तालुका पशुचिकित्सालयाची माहिती देऊन तालुक्यातील पशुधनाचा आढावा सांगितला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गणेश निटुरे यांनी केले तर शेवटी डॉ. श्रीधर शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. प्रारंभी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत डॉ. राजकुमार पडिले, डॉ. पडघलवार, डॉ. ओमप्रकाश पोफळे, डॉ. प्रवीण नानजकर, किशन निंबाळकर, रवींद्र मिसाळ, विजय गिरी, केंद्रे, भागवत नामवाड, डॉ. प्रशांत शिंदे, शरद कोहाळे यांच्यासह इतर अनेकांनी केले.

# अवैध दारू विक्री बंद करा;काळेगावघाट ग्रापंचायतीने घेतला दारूबंदीचा ठराव

केज/प्रतिनिधीकेज तालुक्यातील काळेगावघाट येथील अवैध दारू विक्री मुळे अनेकांचे संसार उधवस्त झाले आहेत.त्यामूळे ग्रामपंचायतीने दारू बंदीचा ठराव घेवून गावात होणारी अवैध दारू विक्री बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. सरपंच अविनाश गाताडे सह, ६० गावाकऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन तहसीलदार राकेश गिड्डे व पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांना देऊन गावातील अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी केली आहे.



काळेगावघाट येथे दारू बंदीचा ठराव ग्रामपंचायतीने सर्व सदस्यांच्या सम्मतीने घेतला आहे. त्यानुसार गावातील अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणीस ग्रामपंचायतीचे सरपंच अविनाश गाताडे यांच्यासह ग्रामस्थांनी पोलीस निरीक्षकांकडे केली आहे.

काळेगावघाट येथे मोठ्या प्रमाणावर अवैध दारू विक्री होत असून गावातील तरुण वर्ग दारूच्या व्यसनाच्या आहारी जात आहे. दारूच्या नशेत रस्त्यावर शिवीगाळ करीत वाद करीत आहेत. या व्यसनामुळे अनेकांचे संसार व कुटुंब उध्वस्त होत आहे. या वाढत्या प्रकारची दखल घेऊन गावात दारू विक्री बंद करण्याची मागणी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे केली होती. त्यानुसार २६ जानेवारी रोजी सरपंच अविनाश गाताडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रशांत सुंदरराव कोठावळे यांनी गावात दारू बंदी करण्याचा ठराव मांडला . त्याला राहूल रवींद्र कोठावळे यांनी अनुमोदन दिल्यानंतर गावात दारू विक्री बंद करण्याचा ठराव सर्वानुमत्ते मंजूर करून वरिष्ठ कार्यालयाकडे अहवाल पाठविण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार गावात सुरू असलेली अवैध दारू विक्री बंद करण्यात यावी, अशी मागणी सरपंच अविनाश गाताडे, ग्रामपंचायतीचे सदस्य यांच्यासह योगीराज कोठावळे, आकाश गाताडे, बहाद्दूर मुलानी, अरुण गाताडे, युवराज आगे, त्रिंबक कोठावळे, दत्तात्रय कोठावळे, पांडुरंग कोठावळे, बालासाहेब डोरले, संग्राम आगे यांच्यासह ६० हून अधिक ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे तहसीलदार राकेश गिड्डे व पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्याकडे केली आहे

# शिवाजी विद्यालय बिटरगावचे एन.एम.एम.एस. परीक्षेत घवघवीत यश..!

रेणापूर / प्रतिनिधी :- रेणापूर




तालुक्यातील शिवाजी माध्यमिक विद्यालय, बिटरगावच्या विद्यार्थ्यांनी याही वर्षी उज्वल यश संपादन करत विद्यालयाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे.

यावर्षीच्या छचचड (छीींळेपरश्र चशरपी-र्ली-चशीळीं डलहेश्रीीहळ) परीक्षेत विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे.

यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

कु. रेणुका सिद्राम जाधव - ८० गुण,

शहेनाज सल्लाउद्दीन शेख - ७९ गुण,

या विद्यार्थ्यांना श्री. मल्लिकार्जुन ठोंबरे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे गडझच् शिक्षण संस्था चे अध्यक्ष मा.आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर, उपाध्यक्ष मा. अजित पाटील कव्हेकर'सचिवा सौ प्रतिभाताई पाटील कव्हेकर, संचालिका सौ आदितीताई पाटील कव्हेकर तसेच मुख्याध्यापक श्री. सूर्यकांत चव्हाण,श्री वेणूनाथ यादव, श्री वसंत यादव, श्री विनोद जाधव, श्री यशवंत रमाकांत, श्री अरूण काळे ,श्री पद्माकर लकडे यांनी अभिनंदन केले.

परिसरातील शिक्षणप्रेमी नागरिकांकडूनही विद्यार्थ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत असून विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची ही आणखी एक साक्ष आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा..!

# महायज्ञ सोहळ्याची जय्यत तयारी सुरु महायज्ञ मंडपाचे काम पूर्णत्वास-ह.भ.प.केशव महाराज शास्त्री

केज/प्रतिनिधी -श्रीकृष्ण मंदिर बांधकाम भूमिपूजन कार्यक्रमाच्या निमित्ताने महायज्ञ सोहळा व ह. भ.प. रामराव महाराज ढोक यांच्या राम कथेचे आयोजन ह.भ.प. भागवत भूषण केशव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली व श्रीकृष्ण आश्रम यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे गेल्या एक महिन्यापासून महायज्ञ मंडपाचे काम चालू असून राजस्थान येथून गवत व लाकडी बांबूच्या साह्याने महाकाय यज्ञ मंडपाचे काम आज पूर्णत्वास आले आहे. तसेच राम कथेचा मंडप व भोजन मंडपाचे काम प्रगतीपथावर चालू आहे या कार्यक्रमासाठी केज तालुक्यासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त हे



या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. यामुळे येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी भोजन व्यवस्था,राहण्याची व्यवस्था ही या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

या ठिकाणी मोठ्या संख्येने भाविक महायज्ञ सोहळ्यानिमित्त महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून केज येथील श्रीकृष्ण आश्रम या ठिकाणी येणार आहेत असा कार्यक्रम आपणास न भुतो न भविष्यती पहावयास मिळणार आहे तरी सर्व भावीक भक्तांनी या महायज्ञ सोहळ्याचा लाभ घ्यावा व ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांच्या संगीत राम कथेचा आस्वाद घ्यावा असे आवाहन श्रीकृष्ण आश्रमांचे संस्थापक ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांनी केले आहे.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात मराठी भाषा गौरव दिन ग्रंथप्रदर्शन, व्याख्यात, ग्रंथवाचन,कथाकथन कार्यक्रम घेवून संपन्न

केज/प्रतिनिधी -स्वानंद



सार्वजनिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी वि. वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांची जयंती मराठी भाषा गौरव दिन ग्रंथप्रदर्शन, व्याख्यान, ग्रंथवाचन, कथाकथन आदी सांस्कृतिक कार्यक्रम घेवून साजरा करण्यात आला.

सवप्रथम कुसूमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून पुजन व वंदन करण्यात आले.

सर्व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड हे होते. सकाळी ०७ ते दुपारी ०५ पर्यंत ग्रंथप्रदर्शन घेण्यात आले.

सकाळी ८ ते ९ या वेळात ग्रंथवाचन,९ ते १० या वेळात कथाकथन, १० ते ११ या वेळात व्याख्यान घेण्यात आले.

सकाळी ८ ते ९ या वेळात आनंद गायकवाड, यरारज भोगजकर, दिव्या साबळे, कल्याणी घोगले, अमर पोळ, वेदिका गायकवाड यांनी ग्रंथवाचन केले. ९ ते १० या वेळात सोहम गायकवार, विक्रम गायकवाड, आनंद गायकवाड, कल्पाणी घोगले, वेदिका गायकवाड, यशराज भोगजकर, हरिओम गायकवाड, दिव्या साबळे यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी कथाकथन केले. १० ते ११ या वेळात रामकृष्ण तात्या गायकवाड, कमलाकर साबळे, वेदिका गायकवाड यांची थोडक्यात व्याख्याने झाली. ११ ते १२ या वेळात अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. अध्यक्षीय समारोपात त्यांनी कुसुमाग्रज यांचे चरित्र व मराठी साहित्यातील त्यांचे योगदान या विषयी सविस्तर विवेचन केली. कु सुमाग्रज यांची जयंतीय मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरी होत असल्याचे सांगून मराठी भाषेला शब्दधन देण्याचे कार्य कुसुमाग्रज यांनी केल्याचे सांगी

लाभले आम्हास भाग्य,बोलतो मराठी...

जाहलो खरेच धन्य, ऐकतो मराठी... धर्म, पंथ, जात एक, जाण तो मराठी, येवढ्या जगात नाव, मानतो मराठी...

तसेच असतातेही पैजा जिंके, ऐसी अक्षरे मेळवीन हि

मराठी भाषेतील शब्दांची ताकद असल्याचे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी केले. सकाळी ७ ते ५ पर्यंत ग्रंथप्रदर्शन चालले. या सर्व कार्यक्रमाला विद्यार्थी-विद्यार्थिनी,युवक-युवती,जेष्ठ नागरीक,महिला यांची उपस्थिती होती. ग्रंथप्रदर्शनात मोठ्या प्रमाणात लोकसहभाग होता.

# आनेगाव येथे मराठी भाषा गौरव दिनी रंगला सांस्कृतिक सोहळा;,विद्यार्थ्यांच्या कलाविष्कारांनी आनेगाव शाळेत दणाणला मराठी गौरव दिन

केज/प्रतिनिधी-मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आनेगाव येथे विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणदर्शनाचा अर्थात स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पडला.



सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी बालगीत, लोकगीत, भारुड, लावणी, नाटिका तसेच देशभक्तीपर गीत अशा विविध कलाविष्कारांचे प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. तब्बल २५ हून अधिक कलाप्रकार सादर करण्यात आले.

कार्यक्रमासाठी श्री. चोपणे (केंद्रीय मुख्याध्यापक, यु. वडगाव), दत्तात्रय मुजमुले (जिजाऊ इंग्लिश स्कूल, धनेगाव) तसेच अशोक चौधरी (वसुंधरा विद्यालय, पैठण) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमाची सुरुवात तुला मास्तर बोलवाले ले या गीताने करण्यात आली, तर समारोप शाळा मराठी माझी शाळा मराठी गं या गीताने झाला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक गुजर डी. व्ही., सौ. बावचकर एल. एस. (सहशिक्षिका) व हंडीबाग कोमल अमोल (ट्रेनी शिक्षिका) यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन माजी विद्यार्थिनी कु. ज्ञानेश्वरी गवळी व कु. श्रेयसी काळे यांनी उत्कृष्टरीत्या केले.

या सांस्कृतिक सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमधील कला गुणांना वाव मिळाला असून, मराठी भाषेबद्दलचा अभिमान अधिक दृढ झाला आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.